**<u>ठळक बातम्या</u>**

- १३१ वी घटनादुरूस्ती विधेयक संसदेत नामंजूर झाल्यानंतर विधेयकाच्या बाजूनं जनमत वळवण्यासाठी भाजपाची देशभरात मोहीम

- २०२६-२७ या आर्थिक वर्षात भारताचा जीडीपी ६पूर्णांक ८ दशांश टक्के ते ७ पूर्णांक १ दशांश टक्के राहील असा स्टेट बँक रिसर्चचा अंदाज

- दक्षिण कोरियाचे राष्ट्राध्यक्ष ली जे म्युंग यांच्याशी प्रधानमंत्र्याची चर्चा

- जम्मू काश्मीरमधे उधमपूर जिल्ह्यात बस दरीत कोसळून झालेल्या अपघातात १५ जणांचा मृत्यू, तर २० जण जखमी

आणि

- तमिळनाडूत फटाके कारखाना स्फोटात मृतांची संख्या २५

**<><><><><>**

महिला आरक्षणासाठी आवश्यक असणारं, १३१ वी घटनादुरूस्ती विधेयक संसदेत नामंजूर झाल्यानंतर विधेयकाच्या बाजूनं जनमत वळवण्यासाठी भाजपानं देशभरात मोहीम हाती घेतली आहे. याबाबत अधिक जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून....

**-------------व्हीसी---------------**

*(महिला आरक्षण विधेयक मंजूर न होऊ दिल्याचे परिणाम विरोधी पक्षांना भोगावे लागतील, असा इशारा संसदीय कार्यमंत्री किरेन रिजिजू यांनी दिला आहे. देशातल्या महिलांच्या प्रचंड रोषामुळे घाबरलेले विरोधक आता आपल्या कृतीचं समर्थन करत आहेत असं ते म्हणाले.*

*भोपाळमधे भाजपाने महिला आक्रोश मोर्चाचं आयोजन केलं आहे. यात जवळपास तीस हजार महिला सहभागी होण्याची अपेक्षा आहे. मुख्यमंत्री मोहन यादव, भाजपा प्रदेशाध्यक्ष हेमंत खंडेलवाल हे यावेळी उपस्थित असतील.*

*छत्तीसगडची राजधानी रायपूर इथंही भाजपा आक्रोश मोर्चा काढणार आहे. यात मुख्यमंत्री विष्णुदेव साय, भाजपा प्रदेशाध्यक्ष किरण देव उपस्थित राहतील.*

*घटना दुरूस्ती विधेयकावर चर्चा करण्यासाठी उत्तर प्रदेश सरकारने विधानसभेचं विशेष अधिवेशन बोलावलं आहे.*

*महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या विषयाबाबत आज मुंबईत पत्रकार परिषद घेतली. महिला आरक्षणाच्या बाजूने जनरेटा तयार करण्यासाठी राज्यभरातून एक कोटी महिलांच्या सह्या गोळा करणार असल्याचं त्यांनी जाहीर केलं. तसंच विधेयकाबाबत तालुकास्तरावर जनजागृती करणार असल्याचं त्यांनी सांगितलं. या विधेयकाला विरोध केल्यामुळे विरोधी पक्षांचा महिलाविरोधी चेहरा उघड झाल्याची टीका त्यांनी यावेळी केली. )*

दरम्यान, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या कार्यकारी अध्यक्ष खासदार सुप्रिया सुळे यांनी मुख्यमंत्री फडणवीस यांचे आरोप फेटाळून लावले आहेत. नारी शक्ती वंदन विधेयक २०२३ मधेच संसदेत एकमतानं मंजूर झालं आहे, त्याची अंमलबजाववणी अजूनही झालेली नाही असं सुळे म्हणाल्या. आताचं विधेयक हे महिला आरक्षण नाही तर लोकसभा मतदारसंघाच्या पुनर्रचनेसाठी होतं असं त्या म्हणाल्या.

**<><><><><>**

पश्चिम आशियातला तणाव आणि तेलाच्या संकटामुळे निर्माण झालेल्या जागतिक आव्हानांचा सामना करण्यासाठी भारत सक्षम आहे, असं एसबीआय रिसर्च अर्थात स्टेट बँक ऑफ इंडिया रिसर्चच्या ताज्या अहवालात म्हटलं आहे. २०२६-२७ या आर्थिक वर्षात भारताचा जीडीपी म्हणजेच विकास दर ६ पूर्णांक ८ दशांश टक्के ते ७ पूर्णांक १ दशांश टक्के राहील असा अंदाज या अहवालात व्यक्त केला आहे. २०२५-२६ मध्ये भारताचा विकास दर ७ पूर्णांक ६ दशांश टक्के राहण्याचा प्राथमिक अंदाज आहे.

या अहवालात महागाईचा दर साडेचार टक्के, तर वित्तीय तूट साडेचार ते ४ पूर्णांक ६ दशांश टक्के राहण्याची शक्यता आहे. तापमानवाढ आणि जागतिक संघर्षांमुळे कृषी तसंच लघु उद्योगांसमोर काही आव्हानं असली, तरी भारताची बँकिंग व्यवस्था स्थिर असून जागतिक पुरवठा साखळीत भारतासाठी नवीन संधी उपलब्ध असल्याचंही अहवालात म्हटलं आहे.

**<><><><><>**

पश्चिम आशियातल्या तणावाच्या पार्श्वभूमीवर सुरक्षा सहकार्य, उर्जा स्थिरता आणि प्रादेशिक घडामोडींचा आढावा घेण्यासंदर्भात उच्चस्तरीय चर्चेच्या उद्देशाने राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार

अजित डोवाल काल रियाधमध्ये दाखल झाले. सौदी अरेबियातले भारताचे राजदूत एजाज खान आणि सौदीचे राजकीय व्यवहार विभागाचे सहाय्यक मंत्री सौद अल सती यांनी किंग खालिद विमानतळावर डोवाल यांचं स्वागत केलं. या दौऱ्यादरम्यान डोवाल यांनी सौदीचे ऊर्जा मंत्री प्रिन्स अब्दुलअजीज बिन सलमान, परराष्ट्र मंत्री प्रिन्स फैसल बिन फरहान आणि राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार डॉ. मुसैद बिन मोहम्मद अल ऐबान यांच्याबरोबर बैठका घेतल्या. या बैठकीत उर्जा क्षेत्रातलं सहकार्य वाढवणं तसंच जागतिक पुरवठा साखळीची स्थिरता निश्चित करण्यावर चर्चा झाली.

**<><><><><>**

अमेरिकेबरोबर शांतता चर्चेच्या दुसऱ्या फेरीला सहमती नसल्याचं इराणनं म्हटलं आहे. अमेरिकेचे प्रतिनिधी आज रात्री वाटाघाटींसाठी पाकिस्तानात दाखल होतील, असे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी म्हटलं होतं; इराणनं मात्र या चर्चेची शक्यता फेटाळली आहे.

दरम्यान, इराणनं होर्मुझची सामुद्रधुनी बंद केली असून, इराणच्या परवानगीशिवाय पुढे जाण्याचा प्रयत्न करणाऱ्या जहाजांना लक्ष्य केलं जाऊ शकतं असा इशाराही इराणनं दिला आहे.

दरम्यान, अमेरिकेनं काल होर्मुझच्या सामुद्रधुनीजवळ नौदल नाकेबंदीचं उल्लंघन करण्याचा प्रयत्न करणारं एक इराणी मालवाहू जहाज ताब्यात घेतलं अशी माहिती अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी समाज माध्यमावरून दिली आहे.

**<><><><><>**

दक्षिण कोरियाचे राष्ट्राध्यक्ष ली जे म्युंग हे तीन दिवसांच्या भारत दौऱ्यावर असून आज त्यांनी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्याशी नवी दिल्लीत द्विपक्षीय चर्चा केली. दोन्ही नेत्यांनी विशेष धोरणात्मक भागीदारी अधिक दृढ करण्यावर सविस्तर चर्चा केली. या बैठकीचा मुख्य रोख आर्थिक आणि तंत्रज्ञान क्षेत्रातलं सहकार्य वाढवण्यावर होता. २०३० पर्यंत द्विपक्षीय व्यापार ५० अब्ज डॉलर्सपर्यंत नेण्याचं उद्दिष्ट त्यांनी ठरवलं.

तत्पूर्वी म्युंग यांचं आज राष्ट्रपती भवनात औपचारिक स्वागत करण्यात आलं. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉ. एस. जयशंकर तसंच माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यावेळी उपस्थित होते. त्यानंतर ली आणि त्यांच्या पत्नी किम हे म्युन यांनी राजघाट इथं महात्मा गांधींच्या समाधीवर पुष्पचक्र अर्पण करून

त्यांना आदरांजली वाहिली. सुमारे आठ वर्षांनंतर दक्षिण कोरियाच्या राष्ट्राध्यक्षांचा हा भारत दौरा आहे.

<><><><><>

उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन यांनी आज श्रीलंकेतल्या नुवारा एलिया या भागाला भेट दिली. यावेळी स्थानिक समुदायाने त्यांचे पारंपरिक पद्धतीने स्वागत केले. ते श्रीलंकच्या दोन दिवसांच्या दौऱ्यावर असून आज दुसऱ्या दिवशी त्यांनी भारतीय गृहनिर्माण प्रकल्पांतर्गत बांधलेल्या घरांची पाहणी केली.

<><><><><>

भारताला पहिलं वैयक्तिक ऑलिंपिक पदक मिळवून देणारे कुस्तीगीर खाशाबा दादासाहेब जाधव यांना  पद्मविभूषण मरणोत्तर प्रदान करण्याबाबत येत्या ४ मे पर्यंत निर्णय घ्यावा असे निर्देश मुंबई उच्च न्यायालयाच्या कोल्हापूर सर्किट बेंच ने दिले आहेत. खाशाबा जाधव यांचे चिरंजीव रणजीत जाधव यांनी स्थापन केलेल्या कुस्तीवीर खाशाबा जाधव प्रतिष्ठानतर्फे दाखल याचिकेवर न्यायमूर्ती माधव जमादार आणि न्यायमूर्ती प्रवीण पाटील यांच्या पीठाने हे निर्देश दिले. याबाबत अनेक निवेदनं देऊनही सरकारकडून प्रतिसाद मिळाला नसल्याचं प्रतिष्ठानचं म्हणणं आहे.

<><><><><>

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर गुजरात टायटन्स आणि मुंबई इंडियन्स यांच्यात संध्याकाळी साडेसात वाजता  लढत होणार आहे. दोन्ही संघांकडे अनुभवी खेळाडू आणि युवा खेळाडूंचा समतोल असल्यामुळे आज प्रेक्षकांना चुरशीची लढत पाहायला मिळेल, अशी अपेक्षा आहे.  गुजरात टायटन्स त्यांच्या घरच्या मैदानावर खेळत असल्यामुळे त्यांना स्थानिक प्रेक्षकांचा मोठा पाठिंबा मिळेल. मुंबई इंडियन्सला स्पर्धेत टिकून राहण्यासाठी आजचा विजय महत्त्वाचा आहे.

काल झालेल्या सामन्यांमध्ये कोलकाता नाईट रायडर्सने राजस्थान रॉयल्सवर ४ गडी राखून, तर पंजाब किंग्सने लखनऊ सुपर जायंट्सवर ५४ धावांनी विजय मिळवला आहे.

<><><><><>

जम्मू काश्मीरच्या उधमपूर जिल्ह्यात आज सकाळी एक बस दरीत कोसळून  झालेल्या अपघातात किमान १५ जणांचा मृत्यू झाला, तर २० जण जखमी झाले. कथुआ उधमपूरचे

खासदार आणि प्रधानमंत्री कार्यालयाचे मंत्री डॉ. जितेंद्र सिंग यांनी समाजमाध्यमावर ही माहिती दिली. ही बस रामनगरहून उधमपूरला चालली होती. जम्मू काश्मीरचे नायब राज्यपाल मनोज सिन्हा, मुख्यमंत्री ओमार अब्दुल्ला माजी मुख्यमंत्री मेहबूबा मुफ्ती यांनी या दुर्घटनेबद्दल तीव्र दुःख व्यक्त केलं आहे. पोलीस, तसंच राज्य आपत्ती प्रतिसाद दलाची पथकं घटनास्थळी पोहोचली असून मदतकार्य सुरु झालं आहे.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी तसंच प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी या दुर्घटनेबद्दल शोक प्रकट केला असून मृतांच्या कुटुंबांना प्रत्येकी २ लाख तर जखमींना प्रत्येकी ५० हजार रुपयाची मदत जाहीर झाली आहे.

**<><><><><>**

तमिळनाडूत विरुधुनगर इथं काल फटाक्यांच्या कारखान्यात झालेल्या स्फोटात मृतांची संख्या २५ झाली आहे. मृतांमधे २२ महिला तर ३ पुरुष आहेत. स्फोटाचा कचरा उचलताना काल १२ जण जखमी झाले. त्यात पोलीस आणि अग्निशमन दल कर्मचाऱ्यांचा समावेश आहे. जखमींवर रुग्णालयात उपचार करण्यात येत आहेत. राज्य मंत्रिमंडळाच्या सदस्यांनी रुग्णालयात जाऊन जखमींची विचारपूस केली.

**//<><><><><>//**